# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:09.06.2025** **वारःसोमवार**

1. राज्यात डिसेंबर 2025 पर्यंत सर्व प्रमुख शासकीय कार्यालयात कामकाजासाठी सौर ऊर्जेचा वापर करणार
2. प्राथमिक आरोग्य सेवांचे राज्यात जाळे निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात येणार
3. साताऱ्यात भरणार 99 वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आणि
4. शिक्षकांना प्रशिक्षणाला घेऊन जाणाऱ्या मिनी बसला अपघात 31 जण जखमी

**मुख्यमंत्री-सूर्य घर योजना**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल पुण्यातल्या औंध इथं महाऊर्जाच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या उद्घाटन झालं. प्रधानमंत्री सूर्य घर योजना राज्यात प्रभावीपणे राबविणार असल्याचं सांगून राज्यातल्या सर्व प्रमुख शासकीय कार्यालयात, डिसेंबर 2025 पर्यंत सौर ऊर्जेचा वापर सुरू करण्यात येणार मुख्यमंत्र्यांनी यावेळी बोलताना सांगितलं. यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले....

**दोन हजार अठरा साली याचं काम सुरू केलं होतं. अपारंपरिक ऊर्जेच्या क्षेत्रात महाराष्ट्राने अतिशय उत्तम काम केलेलं आहे. गेल्या दोन वर्षांमध्ये संपूर्ण देशामध्ये चार लाख पंप लागले. महाराष्ट्राने पाच लाख पंप लावलेले आहेत दुसरं सौर कृषी वाहिनी योजनेच्या अंतर्गत सोळा हजार मेगावॅटचे फिडर हे आपण सोलरवर नेतो आहोत त्याचं काम अत्यंत वेगाने चाललेलं आहे. हा एशियातला सगळ्यात मोठा प्रोजेक्ट आहे जो आपण दोन हजार सव्वीस पर्यंत पूर्ण करणार आहोत. एक अजून टार्गेट आहे की दोन हजार पंचवीस च्या डिसेंबरपर्यंत प्रमुख सरकारी इमारती या सोलरईज झाल्या पाहिजेत त्यादृष्टीनं देखील काम चाललेलं आहे.**

दरम्यान, मावळ तालुक्यातील आंबी- तरंगवाडी इथल्या पुष्पलता डी. वाय. पाटील रुग्णालयाचं उद्घाटन देखील काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आलं. हे धर्मादाय रुग्णालय 600 खाटांचं असून अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त विविध सेवा तिथे उपलब्ध आहेत. आंबी, मावळ, तळेगाव भागातील जनतेला या रुग्णालयातून आरोग्यसेवा उपलब्ध होणार असून रुग्णालयाने स्वतःचा ऑक्सिजन प्रकल्प उभारला आहे.

प्राथमिक आरोग्यावर भर दिल्यास विशेषोपचार असलेल्या संदर्भ सेवांवरील ताण कमी होतो. त्यामुळे राज्यात प्राथमिक आरोग्य सेवांचे जाळे निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात येणार असल्याचं प्रतिपादन फडणवीस यांनी यावेळी केले.

पुण्यातल्या सणसवाडी इथल्या जॉन डिअरच्या प्रकल्पाच उद्घाटनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालं. जॉन डिअरनं कृषी क्षेत्राला समृद्ध करण्यासाठी तसंच शेतकऱ्यांना संपन्न करण्यासाठी उन्नत तंत्रज्ञानावर आधारीत यंत्रांच्या उत्पादनात पुढाकार घ्यावा आणि हे तंत्रज्ञान महाराष्ट्रात तयार करून जगात निर्यात करावे, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

**सरकारची 11 वर्षे**

सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्त्वांनी प्रेरित होऊन भारताने गेल्या दशकात उल्लेखनीय परिवर्तन घडवून आणले आहे. आकाशवाणी न्यूज तुमच्यासाठी गेल्या 11 वर्षात प्रमुख क्षेत्रांमध्ये सरकारच्या प्रयत्नांवर एक विशेष वृत्त सादर करत आहे. आज, आम्ही नारी शक्तीवर लक्ष केंद्रित करत आहोत. सामाजिक परिवर्तन आणि समावेशनाच्या या प्रवासात, महिलांना जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सक्षम केलं जात आहे. माझ्या सहकारी सविता म्हसकर यांच्या आवाजातील हा वृत्तांत...

**गेल्या दशकात, महिला सक्षमीकरणाकडे भारताचा दृष्टिकोन उल्लेखनीय परिवर्तनातून गेला आहे, कल्याणाच्या पलीकडे समावेश, प्रतिष्ठा आणि समान संधीकडे जात आहे.**

**सरकारचा प्रमुख पोषण कार्यक्रम, मिशन पोषण द्वितीय मध्ये, मुले, किशोरवयीन मुली आणि मातांवर लक्ष केंद्रित केले आहे. याच्या केंद्रस्थानी 2018 मध्ये सुरू झालेले पोषण अभियान आहे. दोन लाखांहून अधिक अंगणवाडी केंद्रं केवळ चांगले पोषणच नाही तर बालपणीचे शिक्षण देण्यासाठी देखील श्रेणीसुधारित केली जात आहेत. पोषण भी पढाई भी सारख्या उपक्रमांद्वारे अंगणवाडी कर्मचाऱ्यांना दर्जेदार पूर्व-शाळा शिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण दिले जाते.**

**आरोग्याच्या बाबतीत, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम आणि जननी सुरक्षा योजना यासारख्या योजनांनी विशेषतः ग्रामीण आणि वंचित भागात सुरक्षित प्रसूती आणि मातृत्व काळजीची उपलब्धता सुनिश्चित केली आहे.**

**स्वच्छ भारत अभियानांतर्गत, 12 कोटींहून अधिक शौचालये बांधण्यात आली आहेत. उज्ज्वला योजनेने 10 कोटींहून अधिक एलपीजी कनेक्शन प्रदान केले आहेत, महिलांना स्वयंपाकाच्या हानिकारक धुरापासून मुक्त केलं आहे. जल जीवन अभियानाने 15 कोटींहून अधिक ग्रामीण घरांमध्ये नळाचं पाणी पोहोचवलं आहे, परिणामी पाणी संकलनाचा दैनंदिन भार कमी झाला आहे.**

**शिक्षणात मुलींच्या शाळेतील नोंदणीमध्ये 75.5 टक्क्यांवरून 78 टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. 4.2 कोटींहून अधिक खाती उघडण्यात आलेल्या सुकन्या समृद्धी योजनेमुळे मुलींना आर्थिक सुरक्षितता मिळाली आहे.**

**या परिवर्तनात कायदेशीर सुधारणांनीही मोठी भूमिका बजावली आहे. तिहेरी तलाक रद्द करणे आणि संसद आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांसाठी 33 टक्के जागा राखीव ठेवणारा ऐतिहासिक नारी शक्ती वंदन अधिनियम, लैंगिक न्याय आणि प्रतिनिधित्वाकडे एक निर्णायक बदल दर्शवितो.**

**हा प्रवास केवळ आधार देण्याबद्दल नाही तर तो अशा राष्ट्राची उभारणी करण्याबद्दल आहे जिथे महिला, घरे, शाळा, कामाच्या ठिकाणी आणि संस्थांमध्ये आघाडीवर राहून नेतृत्व करतील.**

**अ.भा.मराठी साहित्य संमेलन**

99 वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन साताऱ्याला होणार आहे. ते आयोजित करण्याचा मान साताऱ्यातील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाहूपुरी शाखेला आणि मावळा फौंडेशनला मिळणार आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या आज पुणे इथं झालेल्या बैठकीत एकमतानं हा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्राध्यापक मिलिंद जोशी यांनी दिली. साताऱ्यात 32 वर्षांनी होणारं हे 4 थं संमेलन असेल.

**कृषी संकल्प अभियान- धाराशिव**

धाराशिव जिल्ह्यातील, आठ तालुक्यातल्या 50 गावात कृषी संकल्प अभियान राबवण्यात येत असून त्या माध्यमातून कृषी विज्ञान केंद्राची दोन पथकं दररोज सहा गावात जात आहेत. जिल्ह्यातील गावखेड्यातल्या शेतकऱ्यापर्यंत कृषी संकल्प अभियानाचा विषय पोहोचत आहे. एकुयात एका लाभार्थी शेतकऱ्याचा प्रतिसाद....

**त्यामध्ये सोयाबीनचे जास्तीत जास्त उत्पादन कसं वाढवता येईल त्याच्यामध्ये सुधारित वाण असणारे सात शे सव्वीस सात शे त्रेपन्न नऊ शे ब्याण्णव सोयाबीनच्या जातीबद्दल माहिती दिली त्याच्यानंतर आंतरपीक म्हणून चुरीचंही घेण्यासाठी त्यांनी आम्हाला मार्गदर्शन केलेलं आहे कारण फक्त सोयाबीनचे भाव आज कमी होत असे तर त्याला सोबत पर्याय तुरीसारखा एखादा वाण नवीन असलेलं त्याच्यातून उत्पादन घेऊन त्याचा शेतकऱ्यांना जास्तीत जास्त फायदा करून घेण्याबद्दल त्यांनी माहिती दिली तर हे बीज प्रक्रिया करणं स्वयसाठी किती गरजेचं आहे आणि त्याचा फायदा किती होऊ शकतो उत्पादन वाढीमध्ये किती दोन ते तीन क्विंटलला फरक पडू शकतो अशा पद्धतीनं माहिती दिलेली आहे**

**कोरोना संसर्ग वाढीचे कारण**

राज्यात मे महिन्यापासून पुन्हा होत असलेल्या कोरोना संसर्गातील वाढीला कारणीभूत असलेला कोरोना विषाणूचा उप प्रकार स्पष्ट होण्यासाठी, विषाणूच जनुकीय क्रमनिर्धारण करण्यात येत आहे. पुण्यातील राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था म्हणजे एनआयव्ही आणि बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयात ही सुविधा उपलब्ध असून देशभरातून जनुकीय क्रम निर्धारणासाठी इथे नमुने येतात. बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रमुख आणि आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक झाली असून या बैठकीत महाविद्यालयाला जनुकीय क्रम निर्धारणासाठी नमुने पाठविण्याची सूचना करण्यात आली आहे.

**रेल्वे**

भारतीय रेल्वे खानपान आणि पर्यटन महामंडळ अर्थात आयआरटीसीटीनं ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाला उजाळा देण्यासाठी तसंच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्याचा परिचय करून देण्यासाठी, 'छत्रपती शिवाजी महाराज सर्किट' या एका विशेष रेल्वेची घोषणा केली आहे. ही यात्रा 'भारत गौरव टुरिस्ट ट्रेन' अंतर्गत आज पासून सुरू होत असून पहिल्या दिवशी रायगड किल्ला येथे भेट देणार आहेत.

**कीर्तन शिक्षक पुरस्कार**

पुण्यातल्या श्रीहरिकीर्तनोत्तेजक सभेच्या वतीने पहिला कीर्तनशिक्षक पुरस्कार, ज्येष्ठ कीर्तनकार कमलताई पराडकर यांना नुकताच प्रदान करण्यात आला. संस्थेच्या नारद विद्या मंदिरात गेले सव्वा महिना सुरू असलेल्या, वासंतिक कीर्तन वर्गाच्या समारोप शनिवारी झाला. या समारोप समारंभात, हा पुरस्कारा प्रदान करण्यासह बालवर्ग ते प्रशिक्षण वर्ग अश्या सहा कीर्तन वर्गातल्या गुणानुक्रमे पहिल्या तीन प्रशिक्षणार्थींना गौरव आलं. गेली 54 वर्ष होत असलेल्या या कीर्तन प्रशिक्षण उपक्रमात राज्यभरातील 128 प्रशिक्षणार्थींनी प्रत्यक्ष तसंच आभासी पद्धतीने सहभाग घेतला.

**अपघात- रत्नागिरी**

मुंबई-गोवा महामार्गावर काल सकाळी रत्नागिरी तालुक्यातल्या, निवळी घाटात बावनदीच्या जवळ एलपीजी वाहतूक करणारा टँकर आणि मिनी बस यांची धडक होऊन झालेल्या अपघातात मिनी बस दरीत कोसळून 31 प्रवासी जखमी झाले. त्यामध्ये 15 पुरुष आणि 16 महिलांचा समावेश आहे जखमींना जिल्हा शासकीय रुग्णालयात हलवण्यात आलं असून, दोन महिलांना अतिदक्षता विभागात ठेवण्यात आलं आहे. ही मिनी बस शिक्षकांना प्रशिक्षणासाठी रत्नागिरीला घेऊन येत होती. दरम्यान, अपघातग्रस्त टँकरमधून एलपीजीची गळती होत असल्यामुळे मुंबई-गोवा महामार्गावरून प्रवास करणारी वाहनं पाली आणि संगमेश्वर इथून पर्यायी मार्गांनी वळवून, वाहतूक सुरू ठेवण्यात आली होती.

**हवामान**

सांगली जिल्ह्यात विविध तालुक्यात काल संध्याकाळी जोरदार पाऊस झाला. येत्या 24 तासात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे. तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह पावसाची शक्यता असल्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.